| | |
|---|---|
| | दाखल दिनांक २०.०२.२०२३ |
| | नोंदणी दिनांक- २०.०२.२०२३ |
| | निकाल दिनांक- ०२.०५.२०२६ |
| | कालावधी - वर्षे ०३ महिने ०३ दिवस. १३ |

## भाग -अ

**[ परिच्छेद क्र.४४(१), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात.

(पिठासीन अधिकारी : एस.व्ही.जंगमस्वामी)

## नियमीत फौजदारी खटला क्रमांक ३२/२०२३ निशाणी क्र. ३३/ब

| न्यायनिर्णय दिनांक : ०२.०५.२०२६ | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल/ अपराध क्र. १६४/२०२२ | पन्हाळा पोलीस ठाणे, पन्हाळा जि.कोल्हापूर<br>भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४,५०६,सह कलम ३४ प्रमाणे |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार,<br>मार्फत : सहा.पोलिस निरिक्षक पन्हाळा पोलीस ठाणे, ता.पन्हाळा जि.कोल्हापूर. |
| **अभियोग पक्षातर्फे अभियोक्ता** | अॅड. एस.एस.गर्जे सहा.सरकारी अभियोक्ता |
| **विरूद्ध** | |
| **आरोपी** | १.पांडुरंग ज्ञानदेव भोपळे,व.व.५२, धंदा- शेती,<br>२.बबन ज्ञानदेव भोपळे, व.व.४५,धंदा- शेती<br>३.दिगंबर पांडुरंग भोपळे, व.व.२२,धंदा-शिक्षण<br>सर्व रा. पोर्ले तर्फे ठाणे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | अॅड. एस.ए.इंगवले, विधीज्ञ |

## भाग -ब

**[ परिच्छेद क्र.४४(२), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ११.१२.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ११.१२.२०२२ |

| | |
|---|---|
| चार्जशीट (अंतीम अहवाल) दिनांक | २०.०२.२०२३ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | १४.०७.२०२५ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक | ०८.०४.२०२४ |
| न्यायानिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | ०२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२.०५.२०२६ |
| शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर | ..... |

## आरोपींचा तपशील

| आरोपींची नांवे | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा / आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा | आरोपी बंदी अस- लेला कालावधी फौ.प्र.सं.क ४२८नुसार सुट देणेकरीता |
|---|---|---|---|---|---|---|
| १.पांडुरंग ज्ञानदेव भोपळे,<br>२.बबन ज्ञानदेव भोपळे,<br>३.दिगंबर पांडुरंग भोपळे, | सी.आर.पी.सी. ४१-अ प्रमाणे नोटीस दिली. | ---- | भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३,५०४ ५०६, सह कलम ३४ प्रमाणे | आरोपींना निर्दोष मुक्त करणेत येते | ... | ... |

## भाग -क
**[ परिच्छेद क्र.४४(३), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

### अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र. १ | प्रदीप शहाजी पाटील | फिर्यादी |
| सा.क्र. २ | श्रीकांत शहाजी पाटील | जखमी साक्षीदार |

**ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| ब.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| को.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी २७/क | फिर्याद वरील सही |

**ब. बचाव पक्ष :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २९/क | घटनास्थळ/जप्ती पंचनामा |
| २. | ३०/क | फिर्यादी प्रदीप शहाजी पाटील याचे वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ३. | ३१/क | जखमी साक्षीदार श्रीकांत शहाजी पाटील वैद्यकिय प्रमाणपत्र |

**क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी :-**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल :**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ६९/२०२२ | ३२ इंच लांबीची तिन पेरे व तिन गाठी असलेली एक चिव्याची काठी |
| २. | ६९/२०२२ | केबलचा गोलाकार तुकडा त्यावर काळे प्लॅस्टीक कव्हर असलेला ३१ इंच लांबी असलेला |
| ३. | ६९/२०२२ | केबलचा गोलाकार तुकडा त्यावर काळे प्लॅस्टीक कव्हर |

| | | |
|---|---|---|
| | | असलेला सुमारे ३५ इंच लांबी असलेला |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ०२.०५.२०२६ )

१. प्रस्तुतचा खटला हा आरोपीं विरूद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन -**

२. फिर्यादी व आरोपी हे एका गावचे राहणारे असून फिर्यादी यांची शेतजमिन गट क्रमांक ३३४ क्षेत्र फिर्यादी यांनी वाट्याने त्यांच्या गावातील नागनाथ शिंदे यांना कसण्यासाठी दिलेले आहे. आरोपी क्र. १ यांची शेतजमिन ही फिर्यादी यांच्या शेतजमिनीला लागून आहे. फिर्यादी व आरोपी यांच्या मध्ये शेतजमिनीच्या हद्दीच्या कारणावरुन वाद आहेत. आरोपी क्र. १ याने फिर्यादी यांच्या शेतातील ऊसाची अर्धी सरी ऊस तोडून नेला असून वाटेकरी यांनी आरोपी क्र. १ यांस तु आमचे शेतातील ऊस का तोडून नेलास असे विचारले असता आरोपी क्र. १ याने वाटेकरी यांना " तु कोण विचारणार ही माझी शेतजमिनीची हद्द आहे , तु तुझ्या मालकाला घेवून ये "असे बोलले असता दि.११.१२.२०२२ रोजी दुपारी ०३.३० वाजणेचे सुमारास पन्हाळा येथील पोर्ले तर्फे ठाणे या गावातील आरोपीचे राहते घराचे दारात ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथे फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ श्रीकांत पाटील असे आरोपी क्र. १ यांस शेतातील ऊस का तोडलास असे विचारणेसाठी गेले असता घराच्या दारात आरोपी क्र. १ ते ३ आणि आरोपी क्र. १ यांची चुलती समा भोपळे व इतर त्यांचे भावकीतील लोक होते. त्यावेळी समा भोपळे हिने फिर्यादीस "तु इथून घरी जा " असे सांगीतले नंतर फिर्यादीने सांगीतले की, आरोपी क्र. १ हा शेतजमिनीची हद्द पण दाखवायला येत नाही आणि शिव्या देतो असे सांगून फिर्यादी व त्यांचा भाऊ घरी येण्याकरिता निघाले असता आरोपी क्र. १व २ यांनी पाठीमागून येवून त्यांच्या हातातील काठीने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या मनगटावर मारुन " तुझ्या आईला घोडा लावतो " अशी शिवीगाळ करु लागले. त्यावेळी फिर्यादी यांचा भाऊ भांडणे सोडवण्यास आला असता त्याला आरोपी क्र.३ याने त्याच्या हातामधील केबलने पाठीत मारुन "तुला ठेवतच नाही "अशी धमकी दिली. त्याचवेळी आरोपी क्र. २ याने त्याच्या हातातील काठीने फिर्यादीच्या भावाच्या डाव्या गुडघ्यावर मारुन लाथाबुक्यांनी मारहाण केली अशा स्वरुपाची फिर्याद फिर्यादीने पन्हाळा पोलीस ठाणे येथे दाखल केली.

३. फिर्यादीने दाखल केलेल्या फिर्याद वरुन ठाणे अंमलदार यांनी गु.र.नंबर १६४/२०२२ हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास हा पो.ना.व्ही.डी.जाधवर यांच्याकडे दिला. तपासा दरम्यान त्यांनी घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर आरोपी क्र. २ बबन ज्ञानदेव भोपळे याने गुन्हयातील एक चिव्याची काठी आणि दोन केबलचे काळे प्लॅस्टीकचे कव्हर असलेले गोलाकार तुकडे हे दोन पंचासमक्ष हजर केले आणि त्यांनी ते जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा तयार केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. फिर्यादी व जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले. त्यांनी तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपी क्र.१ ते ३ यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४,५०६, सह कलम ३४ प्रमाणे निशाणी क्र.१७ अन्वये दोषारोप नोंदविला व निशाणी क्र. १८ व २० अन्वये आरोपी क्र.१ ते ३ यांचे निवेदन नोंदविले. त्यामध्ये आरोपींनी गुन्हा अमान्य करुन त्यांचेविरुध्द खटला चालविण्याकामी विनंती केली.

५. अभियोग पक्षातर्फे एकूण दोन साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली.

६. आरोपीं विरुध्द अभिलेखावर कोणताही दोषात्मक पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन हे सोडून देण्यात आले.

७. अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता अॅड.एस.एस.गर्जे आणि बचाव पक्षातर्फे विधिज्ञ अॅड एस.ए.इंगवले यांचा युक्तीवाद ऐकला. खटल्याचे निकालासाठी माझे विचारार्थ खालील मुद्ये उपस्थित झाले, त्यावर मी नोंदविलेले कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणेः

| अ.न. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की दि.११.१२.२०२२ रोजी दुपारी ०३.३० वाजणेचे सुमारास पन्हाळा येथील पोर्ले तर्फे ठाणे येथील आरोपी चे राहते घराचे दारात ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथे आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना काठीने व केबलने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली आणि काठीचा आणि केबलचा सदर गुन्हयात | |

| | | |
|---|---|---|
| | हत्यार म्हणुन वापर केला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीस व साक्षीदार यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक साधी दुखापत केली व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नकारार्थी.** |
| ३. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरसःनार्थ फिर्यादी व साक्षीदारांचा उद्येशपुर्वक अपमान करून त्यांना प्रक्षोभीत केले व त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य करण्यास उद्युक्त केले आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नकारार्थी.** |
| ४. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाचे पुरसरनार्थ फिर्यादी व साक्षीदाराला जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नकारार्थी.** |
| ५. | कोणता आदेश ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

८. अभियोगपक्षाने आरोप सिध्दी पृष्ठर्थ फिर्यादी-प्रदिप शहाजी पाटील (सा.क्र.१) याची साक्ष (निशाणी क्र.२६) आणि जखमी साक्षीदार श्रीकांत शहाजी पाटील याची साक्ष (निशाणी क्र.२८) वर नोंदविली. फिर्यादी व आरोपी पक्षामार्फत सदर प्रकरणा संदर्भात न्यायालया बाहेर त्यांची तडजोड झाल्याबाबत तशी तडजोड पुरसीस (निशाणी क्र.२५) वर दाखल करण्यात आली. आरोपी पक्षामार्फत अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.२९) आणि फिर्यादी

व जखमी साक्षीदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र. ३० व ३१) हे मान्य करण्यात आले. त्यानंतर फिर्यादीने आपला पुरावा हा निशाणी क्र. ३२ वर पुरसिस दाखल करुन बंद केला. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा हा निशाणी १ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत</u>** :

९. मुद्या क्रमांक १ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रित चर्चिले आहेत. फिर्यादी प्रदिप (सा.क्र.१) याने आपल्या पुराव्यात असे सांगितले की, श्रीकांत शहाजी पाटील हा त्याचा भाऊ व शहाजी पाटील हे त्याचे वडील आहेत. सर्व आरोपी हे त्याचे नातेवाईक आहेत. घटना ही दोन वर्षापुर्वी घडली. त्यादिवशी त्याच्यामध्ये व आरोपीमध्ये किरकोळ वाद झाले होते. त्याने पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द कोणतीही फिर्याद दाखल केली नाही . त्याने फिर्याद वरील त्याची सही ओळखली परंतू फिर्याद मधील मजकुर हा त्याला माहिती नसल्याचे त्याने सांगीतले. त्याने त्याच्या पुराव्यात पुढे असे सांगीतले की, दिनांक ११.१२.२०२२ रोजी दुपारी ३.३० वाजता तो व त्याचा भाऊ मोटारसायकल वरून आरोपींच्या घरी गेले त्यावेळेस आरोपींनी त्यांना काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली व आरोपी दिगंबर भोपळे याने त्याच्या भावाच्या पाठीत बेस केबल वायरने मारहाण केली आणि आरोपींनी त्याला सोडणार नाही अशी धमकी दिली असे काही घडले नसल्याचे सांगीतले. त्याने त्याच्या सरतपासा दरम्यान अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने तिला फितुर घोषित करून त्याचा उलटतपास घेतला.

१०. अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान त्याने असे सांगीतले की, त्याला फिर्याद मधील अधोरेखांकित भाग "अ" मधील मजकुराबाबत काही माहिती नसून पोलिसांनी तसा मजकूर त्याच्या जबाबात का नमुद केला याचे कारण सांगू शकत नाही. सदर प्रकरणा संदर्भात त्याच्यात व आरोपींच्या मध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असून त्यास पुरक अशी तडजोड पुरसीस निशाणी क्र.२५ नुसार दाखल केली आहे. सदरचे प्रकरण हे तडजोडीने मिटले असल्याने त्याची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नाही.

११. श्रीकांत (सा.क्र.२) हा जखमी साक्षीदार असून त्याने आपल्या पुराव्यामध्ये सांगितले की, फिर्यादी हा त्याचा भाऊ आहे व शहाजी पाटील हे त्याचे वडील आहेत. सर्व आरोपी हे त्याचे नातेवाईक आहेत. घटना ही दोन वर्षापुर्वी घडली. त्यादिवशी त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये किरकोळ वाद झाले होते. त्यामुळे त्याच्या भावाने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला होता. परंतू त्यातील मजकुर त्याला माहिती नाही. दिनांक ११.१२.२०२२ रोजी दुपारी ३.३० वाजता तो व त्याचा भाऊ मोटारसायकल वरून आरोपींच्या घरी गेले. त्यावेळेस आरोपींनी त्यांना काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली व आरोपी दिगंबर भोपळे याने त्याच्या पाठीत बेस केबल वायरने मारहाण केली आणि आरोपींनी त्याला व त्याच्या भावाला सोडणार नाही अशी धमकी दिली असे काही घडले नसल्याचे सांगीतले. त्याने त्याच्या सरतपासा दरम्यान अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितुर घोषित करून त्याचा उलटतपास घेतला. परंतु उलटतपासा दरम्यान त्याने अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केले नाही. त्याने त्याच्या उलटतपासा दरम्यान असे सांगीतले की, सदर प्रकरणा संदर्भात फिर्यादी, त्याच्या व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असून त्या संदर्भात निशाणी क्र.२५ वर तडजोड पुरसीस दाखल केली आहे. त्याने त्याची आता आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नाही असे सांगितले.

१२. अभियोग पक्षातर्फे एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी प्रदिप (सा.क्र.१) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्याने पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द कोणतीही फिर्याद दाखल केली नाही. त्याने फिर्यादवरील त्याची सही ओळखली परंतू फिर्यादीमधील मजकुर हा त्याला माहिती नसल्याचे त्याने सांगीतले. त्याने त्याच्या पुराव्यात पुढे असे सांगीतले की, दिनांक ११.१२.२०२२ रोजी दुपारी ३.३० वाजता तो व त्याचा भाऊ मोटारसायकलवरून आरोपींच्या घरी गेले त्यावेळेस आरोपींनी त्यांना काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली व आरोपी दिगंबर भोपळे याने त्याच्या भावाच्या पाठीत बेस केबल वायरने मारहाण केली आणि आरोपींनी त्याला सोडणार नाही अशी धमकी दिली असे काही घडले नसल्याचे सांगीतले. तो फितुर साक्षीदार आहे. त्याने अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर प्रकरणा संदर्भात त्याच्यामध्ये व आरोपींमध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे सांगितले आणि त्याची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे सांगीतले.

१३. जखमी साक्षीदार श्रीकांत (सा.क्र.२) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्याने त्यादिवशी त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये किरकोळ वाद झाले होते. त्यामुळे त्याच्या भावाने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला होता. परंतू त्यातील मजकुर त्याला माहिती नाही. दिनांक ११.१२.२०२२ रोजी दुपारी ३.३० वाजता तो व त्याचा भाऊ मोटारसायकलवरून आरोपींच्या घरी गेले. त्यावेळेस आरोपींनी त्यांना काठीने व

लाथाबुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली व आरोपी दिगंबर भोपळे याने त्याच्या पाठीत बेस केबल वायरने मारहाण केली आणि आरोपींनी त्याला व त्याच्या भावाला सोडणार नाही अशी धमकी दिली असे काही घडले नसल्याचे सांगीतले. तो फितुर साक्षीदार आहे. त्यांनी अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर प्रकरणा संदर्भात त्यांचेत व आरोपींची कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे सांगितले आणि त्याची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे सांगीतले.

१४. आरोपी पक्षामार्फत अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.२९) आणि फिर्यादी व जखमी साक्षीदार याचे वैद्यकिय प्रमाणपत्र (निशाणी क्र.३० ते ३१) हे मान्य केले. परंतू फिर्यादी प्रदिप (सा.क्र.१) आणि श्रीकांत (सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान आरोपींनी त्यांना कोणतीही मारहाण केली नाही असे सांगीतले त्यामुळे वैद्यकिय प्रमाणपत्रामधील नमुद जखमा या आरोपींनी फिर्यादीला व जखमी साक्षीदाराला मारहाण केल्यामुळे झाल्या असे म्हणता येत नाही.

१५. अभियोग पक्षामार्फत तपासणेत आलेल्या फिर्यादी प्रदिप (सा.क्र.१) आणि श्रीकांत (सा.क्र.२) हे फितुर साक्षीदार असून त्यांनी त्यांचे उलटतपासा दरम्यान सदर प्रकरणा संदर्भात त्यांचेमध्ये व आरोपींमध्ये तडजोड झाली असून सदरचे प्रकरण हे तडजोडीने कोर्टाबाहेर मिटल्याचे सांगितले. त्यास पुरक अशी तडजोड पुरसीस (निशाणी क्र.२५) ही फिर्यादी व आरोपी पक्षामार्फत दाखल करण्यात आली. फिर्यादी प्रदिप (सा.क्र.१) आणि श्रीकांत (सा.क्र.२) यांचा पुरावा आणि तडजोड पुरसीस (निशाणी क्र.२५) यांचे एकत्रित अवलोकन केले असता सदर प्रकरण संदर्भात फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये सदरचे प्रकरण हे तडजोडीने मिटल्याचे दिसून येते. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेल्या साक्षीदार क्र.१ व २ यांचा पुरावा हा आरोपींविरूद्ध लावलेल्या गुन्हयातील घटकांची सिध्दता होणेकामी तुटपुंज्या स्वरूपाचा दिसून येतो.

१६. एकुणच वरील सर्व बाबींचा उहापोह केला असता अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेले फिर्यादी प्रदिप (सा.क्र.१) आणि श्रीकांत (सा.क्र.२) हे फितुर साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात दरम्यान सदर प्रकरणा संदर्भात त्यांच्यात व आरोपींमध्ये सदरचे प्रकरण हे कोर्टाबाहेर तडजोडीने मिटल्याचे सांगितले. तसेच त्यास पुरक अशी तडजोड पुरसीस ही (निशाणी क्र.२५) वर दाखल केली. त्यामुळे फिर्यादी प्रदिप (सा.क्र.१) आणि श्रीकांत (सा.क्र.२) यांचा पुराव्याचे आणि तडजोड पुरसीसचे एकत्रित अवलोकन केले असता सदर प्रकरणा संदर्भात

फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये तडजोडीने सदरचे प्रकरण मिटल्याचे दिसून येते. त्यामुळे साक्षीदार क्र.१ व २ यांचा पुरावा हा आरोपींविरूद्ध लावलेले आरोप शाबीत करण्याकरीता तुटपुंज्या स्वरूपाचा दिसून येतो. त्यामुळे अभियोग पक्षाने लावलेले आरोप हे संशयापलीकडे जावुन सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे संशयाचा फायदा हा आरोपींना देणे न्यायोचित होणार आहे. अभियोगपक्ष हा आरोपींविरूध्द लावलेले भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४, आणि ५०६ सह कलम ३४ प्रमाणे अन्वयेचे आरोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला. सबब मी मुद्दा क्र. १ ते ४ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

१७. जप्त मुद्देमाल एक चिव्याची काठी ३२ इंच लांबीची तिन पेरे व तिन गाठी असलेली केबलचा गोलाकार तुकडा त्यावर काळे प्लॅस्टीक कव्हर असलेला ३१ इंच लांबी असलेला ,केबलचा गोलाकार तुकडा त्यावर काळे प्लॅस्टीक कव्हर असलेला सुमारे ३५ इंच लांबी असलेला हे उपयोगहीन व मुल्यहीन असल्याने ते अपिल कालावधी नंतर नियमा नुसार नाश करण्यात यावेत.

**<u>मुद्या क्रमांक ५ बाबतः</u>**

१८. मुद्या क्रमांक १ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षावरून मी मुद्दा क्रमांक५ च्या उत्तरा दाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते .

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१. पांडुरंग ज्ञानदेव भोपळे, आरोपी क्र २.बबन ज्ञानदेव भोपळे, आणि आरोपी क्र ३.दिगंबर पांडुरंग भोपळे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३,५०४ आणि ५०६ सह कलम ३४ प्रमाणे च्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल ३२ इंच लांबीची तिन पेरे व तिन गाठी असलेली एक चिव्याची काठी, केबलचा गोलाकार तुकडा त्यावर काळे प्लॅस्टीक कव्हर असलेला ३१ इंच लांबी असलेला, केबलचा गोलाकार तुकडा त्यावर काळे प्लॅस्टीक कव्हर असलेला सुमारे ३५ इंच लांबी असलेला हे उपयोगहीन व मुल्यहीन असल्याने ते अपिल कालावधी नंतर नियमा नुसार नाश करण्यात यावेत.

३. आरोपी क्रमांक १ ते ३  यांचा  जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

४. आरोपी क्रमांक १  ते ३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/- इतक्या रकमेचा वैयक्तीक जात मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2026.05.02 12:24:04 +0530

एस.व्ही.जंगमस्वामी ,
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा
जिल्हा-कोल्हापूर

ठिकाण :  पन्हाळा
दिनांक  : ०२.०५.२०२६